PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Aar Aar Aaba Aata Tari Thamba
Year:

Song: Punvech Chandan
Lyricist: Balaji Waghmode

पुनवेचं चांदणं तुम्हांसाठी मी
नेसून आले राया
नका इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
पुनवेचं चांदणं तुम्हांसाठी मी
नेसून आले राया
नका इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
मेघ रांगडा बरसून गेला
फुटली हिरवी माया
मेघ रांगडा बरसून गेला
फुटली हिरवी माया
मग तुम्हीच का हो
व्यर्थ झिजवता काया
नका ना इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
नका इपरीत वागू
पडते तुमच्या पाया

अंजनीच्या सुता
तुला रामाचं वरदान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान

जरा धरा जनाची नाय मनाची लाज
अहो अशानं आपला जलम जाईल वांझ
जरा धरा जनाची नाय मनाची लाज
अहो अशानं आपला जलम जाईल वांझ
पुनवेचं चांदणं तुम्हांसाठी मी
नेसून आले राया
नका ना इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
पुनवेचं चांदणं तुम्हांसाठी मी
नेसून आले राया
नका इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
बीज पेरलं मनी रूजलं
प्रकटली जगात माया
बीज पेरलं मनी रूजलं
प्रकटली जगात माया
मग तुम्हीच का हो
जन्म जाळीता वाया
नका ना इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
नका इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
अंजनीच्या सुता
तुला रामाचं वरदान
अंजनीच्या सुता
तुला रामाचं वरदान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान

तुमच्या डोस्क्यात भरलं
सांगा कसलं खुळं
मी जळा बाहेरील मासोळी तळमळं
तुमच्या डोस्क्यात भरलं
सांगा कसलं खुळं
मी जळा बाहेरील मासोळी तळमळं
पुनवेचं चांदणं तुम्हांसाठी मी
नेसून आले राया
नका ना इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
नका इपरीत वागू
पडते तुमच्या पाया
स्वामी तिन्ही घरचा तू फिरतो दारोदार
स्वामी तिन्ही घरचा तू फिरतो दारोदार
हां तुला खाण्या टपले हे पोरांचे लेंढार
तुला खाण्या टपले हे पोरांचे लेंढार
कुटुंब नियोजन करूनी
कळलं का हा...

कुटुंब नियोजन करूनी
गाऊ समृद्धीचं गाणं
कुटुंब नियोजन करूनी
गाऊ समृद्धीचं गाणं
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
ए अंजनीच्या सुता
तुला रामाचं वरदान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान
एक मुखानं बोला
बोला जय जय हनुमान

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*